REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER – 2017

# नंदुरबार जिल्हयातील आदीवासी राजकीय नेतृत्त्वाचा चिकित्सक अभ्यास



*कल्याणी दिलीप बच्छाव*[1] *, डॉ. शरद घोडके*[2]
[1] *टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.*
[2] *पी.एच.डी. गाईड*

**प्रस्तावना :-**

इंग्रजी मधील (Tribes) या शब्दाचा अर्थ जमात किंवा जमाती असा होतो.आदिपासून किंवा सुरुवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदीवासी असेसंशोधनात संबोधले आहे.भारतीय संविधानात आदिवासींना अनुसुचित जमाती - (Sheduled Tribes) असे संबोधले आहे. भारतीय संविधानातील कलम ३४२ (१) नुसार त्यांचा समावेश अनुसुचित- जमातीमध्ये सर्वसाधारणपणे डोंगराळ प्रोशात आणि जंगलात वास्तव्य करणाऱ्या व ते आधुनिकसंस्कृतीतसेच नविनपद्धती पासुन अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश करण्यात आला आहे.

आधुनिकसमाजाप्रमाणे अतिरिक्त नफा कमावणे, साठेबाजी करणेहे आदिम आर्थिक क्रियाचे वैशिष्टय नाहीतर आपली व आपल्या जमातीच्या गरजा भागवणे, केवळ निर्वाहापुरते काम, उत्पादनकरणेसामुहीक रित्या झटणे, मिळूनखाणे, आर्थिक क्रियामध्ये स्त्रियांचा देखील सहभाग, संघर्षमय आर्थिक जीवन इ. आदिवासीच्या आर्थीक क्रियांचे वैशिष्टय आहे. आदिवासी जमात दीर्घकाळ मागास उपेक्षित जीवन जगत आहे त्यांच्या समोर अनेक प्रकारच्या समस्या, प्रश्न उभे आहेत. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक गोष्टीपासूनते वंचित आहेत. उपेक्षित राहिलेल्या जमातीचे प्रश्न म्हणजे स्वतंत्र भारतासमोर एक आव्हान आहे .

**संशोधन अभ्यासाचे महत्त्व :-**

आपण जर थोडासा गंभीरपणे विचार केलातर भारतातील आदिवासीची सामाजिक व आर्थिक, भौगोलिक सुधारणाकरण्याचा प्रयत्न किती बिकट आणि निष्कर्षाचा आहेहे आपल्याला समजुन येईल. आजच्या युगात मानवाची झालेली वैज्ञानिक प्रगती, विविध सुविधांची झालेलीसोय इ. लक्षात घेता भारतातील ७% आदिवासी अजुनही प्रारंभिक अवस्थेत जीवन जगतात.हेकोणत्याही समाजाला भुषनास्पद नाही.समाजाच्या एका बाजुला संपन्नता नादत आहे.तर दुसऱ्या बाजुला दारिद्रयाच्या दशवताराचे दर्शनहोत असते.कोणत्याही दृष्टीनेहसमाजातीलही पराकोटीची वस्तुस्थिती ठीक नसते. आदिवासींच्या समोर असणाऱ्या प्रश्नांना आर्थीक, सामाजीक, आरोग्यविषयक, सांस्कृतीक अशा अनेक विविध छटा आहेत. त्यामुळे सत्यप्रिय, प्रामाणिक, बाळबोध वळणाच्या या साध्या भोळया आदिवासींचे प्रश्न गुंतागुंतीचे असावेत हा एक दुर्दैवी विरोधाभास आहे.भारतातील आदिवासीमागे काही नवीन प्रश्न बदलत्या काळापासून उभे आहेत.नंदुरबार जिल्हाहा १००% आदिवासी जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे.नंदुरबार जिल्हयातसाक्षरतेच प्रमाण कमी, कुपोषनाचे प्रमाण जास्त आहे.तेथील आदिवासीसाठी विविध क्षेत्रातकामकरणाऱ्या स्वयसेवी संस्था, सामाजिककार्यकरते.शासनसंस्था, प्रशासक, प्रशासन वेगवेगळया प्रकारच सामाजिक, आर्थीक, शैक्षणिके, आरोग्यविषयक, भौगोलिक कार्यकरते आहेत.प्रशासनाकडून राजकीय नेत्याकडून ह्या जिल्हयातील जनतेसाठी, आदिवासीसाठी काय प्रयत्न केले जातात? आदिवासींच्या समस्या, प्रश्न सुटले आहेतका ? त्यांच्या समस्या दुर होवून त्यांचा विकास घडवून आणला आहेका ?कारण आदिवासीचे प्रश्न व समस्या सुटल्यावर त्यांच्यामध्ये विकासाची प्रक्रिया सुरु होवून त्यांची प्रगती घडून येईल वरील सर्व बाबी विचारात घेवून हा विषय महत्त्वाचा वाटतो.

**अभ्यासाचे उद्दिष्टये :-**

१. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी राजकीय नेतृत्त्वाचा आढावा घेणे.
२. नंदुरबार जिल्हयातील निवडून आलेल्या मंत्र्यांचे (आमदार, खासदार) जिल्हयाचा आढावा घेणे.
३. नंदुरबार जिल्हयातीलसद्यास्थिती विचारात घेणे.
४. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी जनतेचेतेथील राजकीय नेतृत्वविषयीचे मत जाणून घेणे.

**गृहितकृत्ये :-**

१. नंदुरबार जिल्हाहा १००% आदिवासीचा जिल्हा आहे.
२. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी जमातीच्या विकासात राजकीय नेतृत्त्वाचे देखील योगदान आहे.
३. नंदुरबार जिल्हयातील आदिवासी जमातीचा विकास आर्थीक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक विविधतेमुळे झालेला आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुतसंशोधनासाठी आवश्यक माहितीसंग्रहितकरण्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीसंग्रह
या दोन्ही पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

१. प्राथमिकस्त्रोत म्हणूनसंशोधकाचे नंदुरबार जिल्हयातील निवडक राजकीय नेत्यांच्या प्रत्यक्षसंपर्कसाधून त्यांच्या कडून प्रश्नावली भरुन मुलाखती घेतल्या आहेत. तसेच प्रत्यक्ष निरिक्षण करुन माहितीसंकलीतकेली आहे.
२. दुय्यम स्त्रोतसामग्री म्हणजे अगोदरसंकलीत केलेल्या माहितीवरुन तथ्य गोळाकरणेहोयसंशोधकानेसार पद्धतीचा वापर आवश्यक त्या ठिकाणी माहिती मिळवण्यासाठी केला आहे. जिल्हापरिषद नंदुरबार, यशंदा(पुणे) , Gov Websites , Internet, शासकीय अहवाल इत्यादीचा यात समावेश आहे.

   विकासासाठी विविध सरकारी योजना [ आर्थीक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक ]असुनहीहा समाज वंचित आहे.नंदुरबार जिल्हयातील आदिवासींच्या विकासात राजकीय नेते, आमदार, खासदार, मंत्री यांचे योगदानकाय आहे. तसेच राजकीय नेत्यांनी केलेल्या कार्यास कितपत यश आले आहेहे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भसुची :-**

१. WWW nandurbarnic in
२. गोविंद गारे, महाराष्टातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, २०००
३. गोविंद गारे, आदिवासींचे शिक्षण, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९७
४. TRTI, पुणे
५. प्रदिप आगवाले, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपुर, २०१२
६. माणिक माने, आदिवासीचे समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपुर, २०१२
७. गुरुनाथ नाडगोंडे, भारतीय आदिवासी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, २०१२
८. गोविंद गारे, आदिवासींचे प्रश्न, आदिम प्रकाशन, पुणे, १९७५